# ePaper शिंदेंनी रात्री कांडी फिरवली अन् हे बसले तब्येतीची कारणं देत-राज ठाकरे



वर्ष - 6 । अंक - 225 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | ।सोमवार।दिनांक 28नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- चांगला समाज निर्माण करणे हे शिक्षकांचे ध्येय असावे
- जरा विसावू या वळणावर...
- राज ठाकरेंचा उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल: उद्धव ठाकरे तब्येतीचे कारण सांगून घरात बसले



# ‘रेकॉर्ड ब्रेक’ गर्दी!

- वसुंधरा संवर्धन जागृतीसाठी सायकलींचा महापूर उसळला!
- पिंपरी-चिंचवडमधील ‘रिव्हर सायक्लोथॉन’ला ‘रेकॉर्ड ब्रेक’ गर्दी
- उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, अभिनेता प्रवीण तरडेंसह मान्यवरांची उपस्थिती



➤➤(सविस्तर वृत्त पान 3 वर)

# चांगला समाज निर्माण करणे हे शिक्षकांचे ध्येय असावे!






## पुरस्कार वितरण सोहळ्यात माजी खासदार राजू शेट्टी यांचे प्रतिपादन

**पुणे । महाईन्यूज ।**

जसा शेतकरी शेतीची मशागत करतो व मग चांगलं पीक येतं, तसे शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या विचारांची मशागत करावी व चांगला समाज, विद्यार्थ्यांचे भवितव्य व पर्यायाने देश घडवावा असे मत माजी खासदार राजू शेट्टी यांनी जगदीशब्द फाउंडेशन आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात व्यक्त केले.

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिक्षक दिन म्हणून जगदीशब्द फाउंडेशन व परिवर्तन सामाजिक संस्था यांच्या वतीने विविध क्षेत्रातील मान्यवरांना राज्यस्तरीय क्रांतीसुर्य व क्रांतीज्योती पुरस्कार वितरण सोहळा पुणे येथे माजी खासदार राजू शेट्टी यांच्या विशेष उपस्थितीत मोठ्या दिमाखात संपन्न झाला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्त्या दिशा पिंकी शेख, पत्रकार श्रीरंग गायकवाड, भूमाता ब्रिगेडच्या तृप्ती देसाई, ज्येष्ठ विधीज्ञ विजय कुरले, साहित्यिक नारायण सुमंत, व्याख्याते जगदीश ओहोळ, परिवर्तन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष महादेव वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

या पुरस्कार वितरण सोहळ्यात राज्यातील सर्व जिल्ह्यातून पुरस्कारार्थी निवडण्यात आले होते. शैक्षणिक, सामाजिक, उद्योग, आरोग्य, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांना यावेळी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जगदीश ओहोळ व सूत्रसंचालन जालिंदर राऊत यांनी केले तर आभार महादेव वाघमारे यांनी मानले.

# धावपटूंना मिळाले हास्ययोगाचे धडे

**पुणे । महाईन्यूज ।**



'टेन्शन हाकला, आनंद मिळवा'... म्हणत नवचैतन्य हास्ययोग परिवाराच्या सदस्यांनी हजारो धावपटूंना रविवारी पहाटे हास्याचे धडे दिले. त्यामुळे काही वेळ म्हाळुंगे बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात हास्याचे फवारे उडाले अन् उत्साहात वाढ झाली.

नवचैतन्य हास्ययोगाचे शहरात २५ हजारांहून अधिक सदस्य आहेत. या परिवाराचे शहरात २१७ हून अधिक क्लब आहे. प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग असलेला हा परिवार हास्ययोगासाठी ओळखला जातो. मॅरेथॉनमध्ये वयाची साठी पार केलेल्या सुमारे ३०० युवकांनी भाग घेतला.

कोथरूड, बाणेर, बालेवाडी, पाषाण, औंधमधील हे युवा सकाळी ६ वाजताच मॅरेथॉनस्थळी पोचले होते. शर्यत सुरू होण्यापूर्वी विविध व्यायाम प्रकारांतही त्यांनी उत्साहाने भाग घेतला. झुंबामध्येही त्यांनी ताल धरला आणि त्यांची पावले आपसूकच थिरकू लागली.

## भोसरीत 'इंद्रायणी स्वच्छता' जनजागृती फेरीत हजारोंचा सहभाग



**पुणे :** पर्यावरण संवर्धन आणि इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाविषयी जनजागृती करण्यासाठी रविवारी आयोजित केलेल्या भोसरीतील 'रिव्हर सायक्लोथॉन २०२२' या सायकल फेरीत २५ हजारांहून अधिक नागरिकांनी सहभाग घेतला.

# खेडशिवापूरात रंगला अधिकाऱ्यांचा शाही विवाह सोहळा...

## सोहळ्यास विविध क्षेत्रातील अधिकारी, मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती

**पुणे । महाईन्यूज ।**
**निलेश दुटाळ ।**

पुणे बँग्लोर हायवेवरील खेड शिवापूर येथील नक्षत्र द रॉयल वेडिंग हॉलचे प्रांगण सनई, चौघडी, वाजंत्री आणि मंगल वाद्यांचा निनाद सदाबहार गीतांची रंगत, आली लग्नघटिका समीप... नवरा सावधान वाजंत्री सावधचित्त अशा अनेक मंगलाष्टकांची लयदार ललकारी... प्रतिष्ठित मान्यवरांचा आशीर्वाद आणि आयोजकांसह कार्यकर्त्यांची धावपळ जेवणाची लज्जतदार मेजवानी असा सगळा शाही सामुदायिक लग्नसोहळा पाहून वधुवरांच्या आ'ईवडील, नातेवाईकांसह वऱ्हाडी मंडळींचे डोळे दिपले. अनेकांच्या डोळ्यात कृतार्थतेच्या भावनांनी गंगा गोदावरी दाटून आली. अशा राजेशाही विवाह सोहळ्याचे साक्षीदार होण्याचा अभूतपूर्व आनंद पाहून वधुवरांच्या आईवडिलांच्या डोळ्यांतील अश्रुधारा पाहून आयोजकांनाही भावना अनावर झाल्या. जावली तालुक्यातील सनपाने येथील माध्यमिक शिक्षक असलेले लक्ष्मण



पवार यांचा डेप्टी कलेक्टर असलेला मुलगा गणेश आणि औरंगाबाद येथील राम खिंडे यांची गटविकास अधिकारी असलेली शीतल यांचा शाही विवाह सोहळा 27 नोव्हेंबर रोजी थाटामाटात पार पडला. दोघेही उस्मानाबाद जिल्ह्यात अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

या शाही विवाह सोहळ्यास सतिश पवार,मोहित पवार,वैशाली पवार ,सुनीता पवार,सुशांत पवार,प्रणाली पवार,साक्षी पवार ,शुभम पवार,यश पवार,सुरेश पवार,रोहित दरेकर,सुमित पवार,लोकेश दुटाळ तसेच नातेवाईक उपस्थित होते.

## वसुंधरा संवर्धन जागृतीसाठी सायकलींचा महापूर उसळला!

# पिंपरी-चिंचवडमधील 'रिव्हर सायक्लोथॉन'ला 'रेकॉर्ड ब्रेक' गर्दी

## उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, अभिनेता प्रवीण तरडेंसह मान्यवरांची उपस्थिती

**पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**पर्यावरण संवर्धन आणि इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाची जनजागृती करण्यासाठी आयोजित केलेल्या भारतातील सर्वात मोठ्या "रिव्हर सायक्लोथॉन" साठी पर्यावरण प्रेमी, नागरिक आणि स्वयंसेवी संस्था- संघटनांनी तुफान प्रतिसाद दिला. सुमारे २५ हजार हून अधिक नागरिकांनी सायकल रॅलीमध्ये सहभाग घेतला.**

**भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून आणि पिंपरी-चिंचवड महापालिका, अविरत श्रमदान, सायकल मित्र अशा विविध संस्था-संघटनांसह शाळा-महाविद्यालयांच्या पुढाकाराने "रिव्हर सायक्लोथॉन- २०२२" चे आयोजन करण्यात आले.**



> **इंद्रायणी नदी संवर्धन आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यासाठी 'रिव्हर सायक्लोथॉन'मध्ये सहभागी झालेल्या सर्व सायकलपटू, पर्यावरण प्रेमी आणि पिंपरी-चिंचवडकर नागरिकांचे आभार व्यक्त करतो. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होताना पिंपरी-चिंचवडकर म्हणून विशेष अभिमान वाटतो. "पर्यावरणाचा जागर" करण्यासाठी पुढकार घेणारी पिंपरी-चिंचवड महापालिका, अविरत श्रमदान, सायकल मित्र यांसह अनेक संस्था, संघटना आणि अप्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभागी होत सहभागी होणाऱ्या प्रत्येकाच्या सहयोगाबाबत कृतज्ञता व्यक्त करतो. पर्यावरणाचे संवर्धन करुया.. आपली पवित्र इंद्रायणी वाचवूया.. !!**
> **-महेश लांडगे,** शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी

या रॅलीचा शुभारंभ राज्याचे उच्च शिक्षण मंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याहस्ते करण्यात आला.

यावेळी अभिनेते दिग्दर्शक प्रवीण तरडे, ट्रिपल महाराष्ट्र केसरी नरसिंग यादव, 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' सायकलपटू प्रिती म्हस्के, पुणे जिल्हाधिकारी राजेश देशमुख, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, पीएमआरडीए आयुक्त राहुल महिवाल आदी उपस्थित होते. अविरत श्रमदान संस्था आणि संयोजन समितीचे डॉ. निलेश लोंढे, दिगंबर जोशी, शिवराज लांडगे, डॉ. आनंद पिसे, बापू शिंदे, सुनील बेळगावकर, डॉ. अश्विनी वानखेडे, रविकिरण केसरकर, सीमा शादबार, तृतीय पंथी प्रतिनिधी गायत्री थेरगावकर यांच्यासह विविध संस्था-संघटनांच्या प्रतिनिधी रॅली यशस्वी करण्यात पुढाकार घेतला. अविरत श्रमदान व संयोजन समितीचे प्रमुख डॉ. निलेश लोंढे म्हणाले की, महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून आणि सर्व संस्था-संघटनांच्या पुढाकाराने एकूण २० हजार १०३ नागरिकांनी प्रत्यक्ष नोंदणी केली होती. रॅलीच्या ठिकाणी ३ हजारहून अधिक नागरिकांनी नोंदणी केली. त्यामुळे सुमारे २५ हजारहून नागरिक या ऐतिहासिक रॅलीत सहभागी झाले. गेल्या पाच वर्षांपासून सुरू असलेल्या या 'रिव्हर सायक्लोथॉन' ला यावर्षी प्रचंड गर्दी आणि तरुणाईचा उत्साह दिसत होता. सेलिब्रेटींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीमुळे रॅलीला ग्लॅमर प्राप्त झाले. महाराष्ट्रासह देशाच्या इतिहासात प्रथमच पर्यावरण संवर्धनासाठी आयोजित केलेल्या सायक्लोथॉनला रेकॉर्ड ब्रेक गर्दी झाली असून, या ऐतिहासिक क्षणाचे पिंपरी-चिंचवडकर साक्षीदार आहेत, असा दावा पर्यावरण क्षेत्रातील जाणकारांनी केला आहे.

### महेश लांडगे जागतिक विक्रम करतील : चंद्रकांत पाटील

उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने झालेली ही रिव्हर सायक्लोथॉन देशातील सर्वांत मोठी आहे. हा विक्रम पुढच्या वर्षी स्वत: लांडगेच मोडतील. आजच्या गर्दीची संख्या पाहता जागतिक विक्रम नोंदवला जाईल. सायकलपटू एवढ्या मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरतील, ही संस्मरणीय बाब आहे. विशेष म्हणजे पुढील वर्षी ५० हजारहून अधिक सायकलपटूंची रॅलीसाठी नोंदणी करा, मी स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निमंत्रित करुन उपस्थित राहण्याची विनंती करतो, असे आवाहनही पाटील यांनी केले.

### आयुष्य समृद्ध करणारी सकाळ : प्रवीण तरडे

अभिनेता प्रवीण तरडे म्हणाले की, आयुष्य समृद्ध करणारी ही सकाळ आहे. देशाचा तरुण बलाढ्य असेल, तर देश घडवणारा आहे. या ठिकाणी ठेवलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अत्यंत विलोभनीय दिसत आहे. कारण, हजारोंच्या संख्येने अबालवृद्ध या सायकल रॅलीसाठी या ठिकाणी जमलेले आहेत. आमदार महेश लांडगे यांच्या पाठीशी तरुणाईची क्रेझ आहे. हे या ठिकाणी पहायला मिळाले. लोकांचा उत्साह आणि सहभाग पाहून आजची सकाळ संस्मरणीय झाली.

### विश्व विक्रमी सायकल रॅली : शेखर सिंह

महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह म्हणाले, पिंपरी-चिंचवडकर आणि पर्यावरण प्रेमी नागरिक एव्हढ्या मोठ्या प्रमाणात सायकल रॅलीत सहभागी होतील, असे अपेक्षीत नव्हते. मात्र, नागरिकांचा आजचा उत्साह पाहाता केवळ मोठ्या कार्यक्रमांसाठीच नव्हे, तर नियमितपणे सायकलपटूंसाठी प्रशासनाने काम केले पाहिजे. सायकल ट्रॅक आणि संबंधित प्रकल्प गतीमान केले पाहिजेत,

# प्राणांतिक उपोषणाला बसलेले 16 कामगार रुग्णालयात

## काहींची प्रकृती चिंताजनक, प्रशासनाची मात्र डोळेझाक

**पिंपरी ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**





डायचंड इंडिया सीट कंपनीतील 123 कामगार गेली पाच दिवस प्राणांतिक उपोषणाला बसले असून, त्यापैकी 16 कामगारांना प्रकृती बिघडल्यामुळे यशवंतराव चव्हाण रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यापैकी काहींचे प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. मात्र या संदर्भात प्रशासन अद्याप डोळे झाकून असून या कामगारांच्या प्रश्नाकडे लक्ष देण्यास कोणीही अद्याप फेकलेले दिसत नाही. डायचंड इंडिया सीट कंपनी चाकणस्थीत असून या कोरियन कंपनीमध्ये महिंद्राच्या गाड्यांचे आसन तयार करण्याचे काम चालते गेल्या बारा वर्षात या कंपनीत एकही कायम कामगार नसून सर्व कामगार कंत्राटी म्हणून भरण्यात आले आहेत.

या कामगारांच्या प्रश्नाबाबत राज्यातील झुंजार कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी सांगितले की, कंपनीमध्ये आज पागल आहेत कंत्राटी कामगार व शिकाऊ कामगार म्हणूनच कामगारांची भरती केली आहे कामगारांना कोणत्याही सोयी सवलती दिल्या जात नसून अद्याप पावतो कोणतीही पगारवाढ देण्यात आलेले नाही याबाबत कंपनी प्रशासनाशी बोलण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही त्यामुळे येथे राष्ट्रीय श्रमिक आघाडीची युनियन स्थापन करून कामगारांच्या मागण्या संदर्भात लढा पुकारला आहे.

## संपादकीय »

# आव्हान तरुणाईच्या तणावमुक्तीचे

***ताणतणाव, सामाजिक-आर्थिक स्थित्यंतरे आणि तांत्रिक प्रगतीतून येणारी सुखासीनता आजच्या तरुणाईपुढे विविध प्रकारची मानसिक आव्हाने उभी करीत आहे. त्या आव्हानांना तोंड देण्यासाठी तरुणाईला सक्षम करणे ही समाजावरील मोठी जबाबदारी आहे. ती कशी पार पाडता येईल?***

आजची तरुणाई फार नाजूक वळणावरून चालली आहे. जीवघेणी स्पर्धा, इंटरनेटमुळे चांगल्या गोष्टींबरोबरच मिळणाऱ्या गेम्स, हिंसा आणि कामोत्तेजना वाढवणाऱ्या फिल्म्स, वेबसाइट्स, आभासी स्वातंत्र्याचा मोह, उत्तेजक पदार्थांची व्यसनं अशा अनेकानेक अपायकारक गोष्टींमुळे अनेक तरुणांची आयुष्य बरबाद होताहेत. मानसिक समतोल ढासळतोय. नैराश्य, राग वेगात तरुणाईत पसरतोय. सर्वच तरुणाईबाबत हे घडतंय असं नाही. काहीजण किंवा जणी प्रामाणिकपणे मूल्याधिष्ठित विचारसरणी अनुसरून, कठीण परिस्थिती स्वीकारून, आपल्यासाठी चांगलं काय आहे याचा विचार करून हिंमतीने, ध्येयाकडे मार्गक्रमण करत आहेत. त्यांच्या घरातील संबंधही सौहार्दपूर्ण आहेत.

मित्र-मैत्रिणी, प्रियकर-प्रेयसी आदी रिलेशनशिप असेल तर ती जबाबदारीचं भान ठेऊन आहे. सोशल मीडियाचा वापर जबाबदारीने केला जातोय. एकूण सर्व आलबेल आहे. अशा तरुणांचा ॲडव्हर्सिटी कोशंट चांगला आहे. (शांत राहून कठीण परिस्थितीतून मार्ग काढण्याची क्षमता.)

सद्यस्थितीत नैतिकतेची परिमाणं बदललेली आहेत. ती बदलत्या काळानुरूप, पिढी दरपिढी तशी नेहमीच बदलतात. आपण करीत असलेली गोष्ट, कृती योग्य की अयोग्य यापेक्षा त्याचे परिणाम आपल्यासाठी अंतिमतः चांगले की वाईट हे तपासून पहाणं महत्त्वाचं. काहीजण परिणामांचा विचार न करता बेभानपणे, बेजबाबदारपणे स्वैराचार करतात. त्याचे परिणाम त्यांना स्वतःला आणि कुटुंबालाही भोगावे लागतात. या सगळ्याला ते जबाबदार असतातच; पण बऱ्याचदा पालकांची त्यांच्याशी असलेली वागणूक, क्वचित, पालकांची बेभान आणि बेजबाबदार वागणूकही मुलांना ताणाखाली आणू शकते.

आज मुलांवर अपरिमित ताण आहेत. जीवघेणी स्पर्धा, चंगळवाद, अतिमुक्त वातावरण, तुटलेले नातेसंबंध इत्यादींमुळे तणाव वाढतो. त्यावर स्वस्थतेसाठी चुकीची पावलं उचलणं, चुकीचं वागणंही घडू शकते. मग सहज मिळणाऱ्या सिगरेट, दारू वगैरे गोष्टी तात्कालिक स्वस्थता देतात. हल्ली मुला-मुलींची निकोप, मर्यादा पाळून असलेली मैत्री स्वागतार्हच आहे. पण मर्यादा ठरवायच्या कशा, कोणी आणि का, हे प्रश्न मुलं विचारतात.




# जरा विसावू या वळणावर...




महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गुरुवारी 'महाराष्ट्र टाइम्स'च्या कार्यालयात आले होते. चर्चेत साहजिकच सोशल मिडिया अर्थात समाज माध्यमांचा विषय आला. राजकारण किंवा समाजकारणामध्ये समाज माध्यमांमुळे तयार होत असलेल्या परिस्थितीबद्दल त्यांच्या बोलण्यातून चिंता जाणवत होती. या माध्यमांवर बंधने घालण्याबाबत विचारल्यावर मात्र अतिशय सावधपणे त्यांनी या सर्वांवर आपले विचार व्यक्त केले. राजकारणाचा एकूण स्तर घसरण्यापासून ते एकमेकांवर पातळी सोडून केली जात असलेल्या टीकेपर्यंत अनेक बाबी त्यांनी चर्चेत आणल्याच. त्याचबरोबर, यावर बंधने आणताना किंवा नियंत्रण ठेवताना खूप काळजी घ्यावी लागेल, असेही आवर्जून सांगितले. अजून याबाबतचे कायदे हे नवीन आहेत, न्यायालयांचे निकालही अजूनही ठोस निर्णय देत नाहीत; तोपर्यंत या संक्रमणावस्थेमध्ये आपणच आपली बंधने घालून घ्यायला हवीत, असा त्यांचा सूर होता. ट्रोल करण्याची अर्थातच पातळी सोडून टीका व लक्ष्य करण्याच्या संस्कृतीबद्दल मात्र त्यांच्या बोलण्यात काळजी होती. तो गोंधळ थांबविण्यासाठी सगळ्यांनीच प्रयत्न करायला हवेत, असेही त्यांनी सुचविले. अर्थात, फडणवीस यांची ही काळजी फक्त त्यांची एकट्याची नाही. तर आज राजकारणात असलेल्या प्रत्येक व्यक्तीला त्याची काळजी आहे. इतकेच नव्हे, तर समाजापुढे जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला या पुढच्या काळात त्याची काळजी घ्यावी लागणार आहे. समाज माध्यमे अस्तित्वात आली, त्या वेळेस त्यावरील स्वातंत्र्य, कोणालाही कोणीही बोलण्याची मिळणारी संधी सगळ्यांनाच हवीहवीशी वाटत होती. कोणत्याही नियंत्रणाविना व्यक्त व्हायला मिळणे ही चांगलीच गोष्ट आहे. पण फडणवीस यांच्या भाषेत सांगायचे झाले तर याबाबतच्या कायद्यामध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे अमर्यादित असले तरीही दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा अधिक्षेप आपण करू शकत नाही. माझी अभिव्यक्ती ही समोरच्याच्या अभिव्यक्तीचा संकोच करू लागली की ती मर्यादा ओलांडते आहे, हे संबंधितांनी लक्षात घेतले पाहिजे. आपल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची तीच मर्यादा आहे.

आपल्या देशामध्ये कोणतीच गोष्ट वापरण्यापूर्वी तिचे शिक्षण घेणे, प्रशिक्षण घेणे, त्याचे नियम समजावून घेणे, त्यातून होणारे बरे-वाईट परिणाम लक्षात घेणे याला अजूनही समाजमान्यता नाही. काही तरी करून अगदी नव्या भाषेत काहीही जुगाड करून एखादी गोष्ट करण्याकडे आपला सार्वत्रिक भर असतो. रस्त्याच्या कडेला चालण्यापासून किंवा सार्वजनिक ठिकाणी वावरण्यापासून ते वाहन चालविण्यापर्यंत बहुतेक सर्व गोष्टी आपण या जुगाड पद्धतीनेच करतो. नागरिकशास्त्र हे गंभीरपणे शिकण्याची गोष्ट आहे व त्याचा उपयोग पुढे आयुष्यात कायम होणार आहे, ही गोष्टच आपल्याला कधीही कोणीही गंभीरपणे शिकविलेली नाही. शंभरातील वीस मार्काला असलेला विषय, त्यात काय शिकवायचे आणि काय शिकायचे अशीच सार्वत्रिक भावना असते. त्यामुळेही रस्त्यावर चालताना आपण इतरांचा विचार न करता घोळक्याने चालतो. रस्ता ओलांडताना पांढरे पट्टे वगळून हव्या त्या ठिकाणी रस्ता ओलांडतो. वाहन चालवितानाही तेच. फक्त वाहन सुरू करून पुढे नेता येणे किंवा प्रसंगी ते थांबविता येणे एवढी क्रिया म्हणजे वाहन चालविणे नसते. स्वतःची आणि त्याच वेळेस रस्त्यावरील इतरांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत सुरक्षितपणे, वाहतुकीचे सर्व नियम पाळून ते चालविणे याला वाहन चालविणे म्हणतात, हे आपल्याला मान्यच नाही. हीच गोष्ट समाज माध्यमांची आहे. त्यावर आपण एखादी गोष्ट लिहिली तर त्याचे नक्की काय परिणाम होतील, याचा विचार करण्याच्या आधीच अनेक मंडळी वाटेल ते लिहून मोकळे होतात. फार काय, नंतर ते काढून टाकू इतका सोपा विचार करतात. त्याचबरोबर आपण व्यक्त होताना दुसऱ्याच्या अभिव्यक्तीवर आक्रमण होत नाहीना, हा विचार खूप दूर राहतो. इतकेच कशाला तर आपली अभिव्यक्ती कोणत्या शब्दांतून व्यक्त करावी, याचे भानही त्यांना नाही. त्याचे प्रशिक्षण घ्यावे असेही कोणाला वाटत नाही. सगळा गोंधळ होतो आहे तो त्यातूनच. हे सगळे होत असतानाच वेळेशी केली जाणारी स्पर्धा ही त्या पलीकडे घेऊन जाते. प्रत्येकाला प्रत्येक गोष्ट सगळ्यांच्या अगोदर सांगायची असते. आपल्यालाच ती पहिल्यांदा कळली आहे, हे जगाला सांगण्यासाठी प्रसंगी खोटी माहितीही प्रसिद्ध करून ती स्पर्धा जिंकण्याचा प्रयत्न केला जातो. ती माहिती खरी आहे का नाही, याची खातरजमा करण्याचे भानही राहात नाही. इतकेच नव्हे तर आपण लिहिलेल्या माहितीमुळे समोरच्या एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तिगत आयुष्यात काय गोंधळ होऊ शकतो, याचाही विचार होत नाही. ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांच्याबाबत नुकताच असा प्रसंग घडला. त्या अगोदरही अनेकांच्या बाबत ते घडले आहे. एखाद्या ज्येष्ठ व्यक्तीच्या निधनाची बातमी सांगण्यात स्पर्धा का असावी, एवढा साधा विचारही आपण करत नाही, हे भयंकर आहे.

# 'अंतराळ- अर्थव्यवस्थे'त भारताची झेप...

**कोणा एका सुज्ञानं इसापला विचारलं, 'सत्याचा विजय होतो, असं म्हणतात. हे सत्य आहे काय?' इसाप म्हणाला,'तशी शक्यता नाकारता येत नाही. फक्त सत्य व विजय हे कोण, कुठे व कधी ठरवतं यावर ते अवलंबून आहे.'(सबब सापेक्षतावादाचा उगम इसापनीतीत असण्याची शक्यता आहे.)**



सध्याच्या 'सत्योत्तर' काळात तर आभासी सत्य, छद्म-सत्य व अप-सत्य अशा अनेक रूपांचं अधिराज्य असताना त्यातून केवल सत्य चिमटीत पकडणं हे महाकठीण होऊन गेलंय. त्यात पुन्हा जागतिक हवामान परिषद नामक मयसभेत सत्याचा शोध म्हणजे अरण्यात हरवलेल्या सुईचा शोधच!

इजिप्तच्या शर्म-अल-शेख नगरीत जगातील धोरणकर्ते, हवामान बदलावर मंथन करण्यासाठीच्या २७ व्या परिषदेस जमले होते. परिषदेच्या अखेरीस 'विद्यमान निधी यंत्रणा हवामान बदलाच्या वर्तमान आणि भविष्यातील प्रभावांना प्रतिसाद देण्यास कमी पडत आहे. ही परिषद हवामान बदलामुळे अतिशय असुरक्षित झालेल्या गरीब व अत्यल्प विकसित देशांना नुकसानभरपाईपोटी निधी देण्यास तत्त्वत: मान्यता देते. निधी यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी विकसित, विकसनशील व अत्यल्प विकसित देशांच्या प्रतिनिधींचा सहभाग घेऊन हंगामी समिती स्थापन करते.' असा मसुदा संमत करण्यात आला.

हवामान बदलामुळे समुद्राच्या पाणी पातळीत वाढ होऊन बुडण्याचा धोका असणाऱ्या प्रशांत महासागरातील व्हॅनुआतू या चिमुकल्या बेटानं नुकसानभरपाईची मागणी, १९९२ साली पहिल्यांदा केली होती. सागरपातळीतील वाढीमुळे जगातील सर्वच समुद्रकिनारे वरचेवर आकुंचन पावत आहेत. छोटय़ा बेटांसाठी प्रलय दिन कधीही येऊ शकतो, अशी अवस्था आहे. या मागणीला तत्त्वत: मान्यता मिळाली. पण ती देताना कर्बउत्सर्जनास रोखण्याविषयी चकार शब्द काढला जात नाही.

ऐतिहासिक प्रदूषणामध्ये अमेरिका, युरोपीय महासंघ, इंग्लंड, रशिया, ऑस्ट्रेलिया, कॅनडा व जपान या सात प्रदूषकांचा वाटा ६७ टक्के आहे. सध्या जगातील निम्म्या प्रदूषणास चीन, अमेरिका व युरोपिय महासंघ जबाबदार आहेत. (भारत व अफ्रिका खंडांचा वाटा अनुक्रमे चार व सात टक्के इतकाच आहे.) ऐतिहासिक प्रदूषणास जबाबदार असलेल्या विकसित देशांनी अविकसित व विकसनशील देशांना हानीची भरपाई दिली पाहिजे. ही मागणीदेखील ३० वर्षांपासून केली जात आहे. मंजूर केलेल्या ठरावाच्या भाषेवरून विकसनशील देशांना (भारत, चीन, इंडोनेशिया आदी) वगळण्याचा उद्देश स्पष्ट दिसतो. 'हवामान बदलाच्या दृष्टीने असुरक्षित देशांची' व्याख्या न करता 'योजनापूर्वक' संदिग्धता बाळगली आहे. सर्व राष्ट्रांना २०३० पर्यंत कर्बउत्सर्जन ५० टक्क्यांनी कमी करण्यासाठी दरवर्षी चार लाख कोटी डॉलर एवढा निधी लागणार आहे. अविकसित व विकसनशील देशांना हा भार पेलवणं अशक्य आहे.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### महिन्याभरात 21 वाळु घाटाचे होणार लिलाव



। मुंबई । महाईन्यूज ।

औरंगाबाद जिल्ह्यातील वाळुघाटाचे लिलाव झाले नसल्यामुळे अवैध वाळुचोरी सातत्याने होत आहे. प्रशासनाकडून देखील गेल्या काही दिवसात सातत्याने कारवाई केली जात आहे. औरंगाबाद जिल्ह्याच्या वाळुघाटाच्या बाबत जनसुनावणी 30 तारखेला होणार आहे.त्यानंतर पर्यावरण समितीकडे हे प्रस्ताव पाठवले जाणार आहेत. या वाळुघाटाच्या लिलावातून सव्वा सात कोटी रुपयांचा महसुल मिळण्याची अपेक्षा आहे.

औरंगाबाद जिल्ह्यात वाळु घाटाच्या लिलावाची प्रक्रिया सुरू झाली असून महिनाभर ही प्रक्रिया चालणार आहे. त्यामुळे डिसेंबर अखेर वाळुघाटाच्या लिलावाला परवानगी मिळण्याची शक्यता आहे.

# राज ठाकरेंचा उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल:

# उद्धव ठाकरे तब्येतीचे कारण सांगून घरात बसले!

## एकनाथ शिंदेंनी कांडी फिरवली अन् बाहेर पडले

। मुंबई। महाईन्यूज ।

मनसे गटाध्यक्षांच्या मेळाव्यात मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांना ही लक्ष केले आहे. तब्येतीचे कारण सांगून घरात बसणाऱ्या उद्धव ठाकरेंना एकनाथ शिंदेंनी जादूची कांडी फिरवत एका रात्रीत घराबाहेर काढले, ते आता राज्यभर फिरत आहे, असा टोला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंना लगावला आहे.

राज ठाकरे म्हणाले की, उद्धव ठाकरे यांच्या अंगावर एक तरी केस आहे का? स्वत:च्या स्वार्थासाठी कोणाचाही हात हातात घेऊन मागे जाऊन बसणाऱ्यांपैकी मी नाही, असा हल्लाबोल राज ठाकरे यांनी केला आहे. बाळासाहेबांची भोंगे उतरविण्याची ईच्छा मनसेने पूर्ण केली, असे सांगतानाच अजूनही काही ठिकाणी भोंगे जोरात सुरू असतील, तिथे तक्रार दाखल करा, पोलिसांनी तसे केले नाही तर त्यांच्यावर न्यायालयाचा अपमान प्रकरणी कारवाई होऊ शकते, आणि तरीही काही झाले नाही तर तिथे ट्रक वर भोंगे लावा अरेला कारे असे उत्तर माझ्या मनसैनिकांनी दिले पाहिजे. आम्ही आंदोलन करूनही सर्व प्रश्न आम्हाला विचारले जातात, आमच्यामुळे अनेक टोलनाके बंद झाले. मात्र अनेकांनी केवळ घोषणा झाल्या त्यांना कुणी विचारले नाही, आम्ही महाराष्ट्राच्या लोकांसाठी आंदोलन केली, ते युपी, बिहारच्या विरोधात नव्हते, नोकरी महाराष्ट्रात होती, आणि जाहिराती या दुसऱ्या राज्यात दिल्या गेल्या, मग आम्हाला नोकरी कशी मिळणार असा प्रश्न विचारला आहे.



**राज ठाकरे म्हणाले की, उद्धव ठाकरे यांच्या अंगावर एक तरी केस आहे का? स्वत:च्या स्वार्थासाठी कोणाचाही हात हातात घेऊन मागे जाऊन बसणाऱ्यांपैकी मी नाही, असा हल्लाबोल राज ठाकरे यांनी केला आहे. बाळासाहेबांची भोंगे उतरविण्याची ईच्छा मनसेने पूर्ण केली, असे सांगतानाच अजूनही काही ठिकाणी भोंगे जोरात सुरू असतील, तिथे तक्रार दाखल करा, पोलिसांनी तसे केले नाही तर त्यांच्यावर न्यायालयाचा अपमान प्रकरणी कारवाई होऊ शकते, आणि तरीही काही झाले नाही तर तिथे ट्रक वर भोंगे लावा अरेला कारे असे उत्तर माझ्या मनसैनिकांनी दिले पाहिजे.**

### उद्धव ठाकरेंवर देशपांडेंची टीका

**मनसेच्या गट अध्यक्ष मेळाव्यात संदीप देशपांडे यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीकास्त्र डागले आहे. मुख्यमंत्री नंबर वन आहे, हे कुणी ठरवले? नंबर वन मुख्यमंत्र्यांच्या कार्यकाळात काय काम झाले? उद्धव ठाकरेंनी काय करून दाखवले, मुंबईतील लोकांचे काय हाल झालेत असा प्रश्नही उपस्थित केला आहे. मुंबईतील जनता प्रश्न विचारणार तेव्हा बाळासाहेबांचे नाव घेत गद्दारी झाली, असे म्हणत सहानभूती ही केवळ सत्तेसाठी हवी आहे. उद्धव ठाकरेंनी केवळ वचने दिली, कामे केले नाहीच असा आरोपही उद्धव ठाकरेंवर केला आहे. हे सत्तेसाठी आहे, महाराष्ट्रासाठी केवळ राज ठाकरे दुसरा पर्याय नाही मुंबईवर आमची सत्ता येणार असा विश्वास संदीप देशपांडे यांनी व्यक्त केला.**

## "राज्यपाल पदावर बसलात म्हणून मान राखतोय नाहीतर..."

### राज ठाकरेंकडून कोश्यारींचा समाचार




। मुंबई । महाईन्यूज ।

मागील काही दिवसांपासून राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आपल्या वादग्रस्त विधानामुळे चर्चेत आले आहेत. मुंबईत एका कार्यक्रमात बोलताना राज्यपाल कोश्यारी यांनी मुंबई आणि महाराष्ट्राबाबत एका वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. मारवाडी आणि गुजराती लोक मुंबईतून गेले तर पैसे राहणार नाही. तसेच, आर्थिक राजधानी म्हणून मुंबईची ओळख आहे, ती सुद्धा पुसेल, असं राज्यपाल कोश्यारी यांनी म्हटलं होतं. यावरून मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी राज्यपाल कोश्यारी यांचा समाचार घेतला आहे.

"आपलं वय काय आपण, बोलतो काय? राज्यपाल पदावर बसला आहे, म्हणून मान राखतोय. नाहीतर महाराष्ट्रात शिव्यांची कमतरता नाही. राज्यपाल कोश्यारी यांनी गुजराती आणि मारवाडी समाजाला विचारावं, तुम्ही तुमचे राज्य सोडून महाराष्ट्रात का आला. तुमच्या राज्यात का नाही व्यापर केला, उद्योग धंदे थाटले. याचं कारण, उद्योग आणि व्यापर करण्यासाठी महाराष्ट्रासारखी सुपीक जमीन कोठे नव्हती," असे राज ठाकरेंनी म्हटलं. हा देश नव्हता तेव्हा या भागाला हिंद प्रांत म्हटलं जायचे. या हिंद प्रांतावर अनेक आक्रमणे झाली.

# 'महाराष्ट्र सरकार आम्हाला कोणतीच सुविधा देत नाही'

## सांगलीतील जत तालुक्यात कर्नाटक समर्थनार्थ फलकबाजी

। सांगली। महाईन्यूज ।

पाणी प्रश्नाकडे महाराष्ट्र शासनाचे लक्ष वेधण्यासाठी जत तालुक्यात कर्नाटक समर्थनार्थ फलकबाजी व मोर्चे काढण्यात येत आहेत. तिकोंडी येथे शनिवारी कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांचे अभिनंदन करणारा फलक वेशीवर लावण्यात आला. रविवारी सकाळी उमराणी येथे सर्वपक्षीय बैठकीत सहा महिन्यात पाणी प्रश्न मार्गी लागला नाही तर कर्नाटकमध्ये जाण्याचा ठराव करण्यात येईल असा इशारा देण्यात आला. तिकोंडी येथे काही ग्रामस्थ कर्नाटकमध्ये जाण्यास इच्छुक आहे, असे सांगत फलक घेऊन फेरी काढण्यात आली. आम्ही कर्नाटकमध्ये जाण्यास इच्छुक आहेत असेही ग्रामस्थ म्हणत आहे. गावातील वेशीवरच्या स्वागत कमानीवर कर्नाटकच्या मुख्यमंत्री बसवराज बोम्मईं यांचा फोटो असलेला फलक लावण्यात आला होता. काही काळानंतर हा फलक काढून टाकण्यात आला.



महाराष्ट्र सरकारच्या तुलनेत कर्नाटक सरकार वेगवेगळ्या सोई – सुविधा व अनुदान देत आहे. तर महाराष्ट्र सरकार म्हैसाळ योजनेचे पाणी देणार, असे गेल्या ४ दशकापासून वारंवार आश्वासन देत आहेत. याच मुद्द्यावर निवडणूक लढवल्या आहेत. तसेच पाणी देण्याचे गाजर दाखवत आहे. आम्हाला महाराष्ट्र कोणतीही सुविधा देत नाही, असा आरोप ग्रामस्थांनी केला.

**पंतप्रधानांचाही केला उल्लेख!**

गावातील कमानीवर बोम्मईंचे छायाचित्र असलेला व कन्नड भाषेत आभार मानण्यात आल्याचा फलक लावण्यात आल्याचे कळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत हस्तक्षेप करून फलक ताब्यात घेतला. दरम्यान उमराणी येथेही रविवारी सकाळी सर्वपक्षिय बैठक झाली. या बैठकीत राज्य शासनाला निर्वाणीचा इषारा देण्यात आला.

# छोट्या-मोठ्या खोक्यांबद्दलचं सोडा, तुमचे कंटेनरमधले खोके काढू का?

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा सूचक इशारा

। गुवाहटी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिंदे गटाचा दोन दिवसांचा गुवाहटी दौरा आज आटोपला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेच्या टीकेला जोरदार प्रत्युत्तर दिलंय. खोक्यांच्या मुद्द्यावरुनही शिंदेंनी ठाकरेंना थेट आव्हान दिलं.**

आमदारांसह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुवाहटीमध्ये जात कामाख्या देवींचं दर्शन घेतलं. शिवाय आसामच्या मुख्यमंत्र्यांचा पाहुणचार घेतला. यावेळी बोलतांना एकनाथ शिंदे म्हणाले की, कामाख्या देवींचं मनोभावे दर्शन घेतलं. सगळ्यांना समाधान आणि आनंद वाटला. काल आसामच्या मुख्यमंत्र्यांनी आमचं जंगी स्वागत केलं. त्यांचे मंत्रिमंडळातील सहकारीही सोबत होते. जिथे आम्ही थांबलो तिथे मुख्यमंत्रीही आले होते. त्यांनी स्नेहभोजन दिल्याचं शिंदेंनी सांगितलं.



### त्यांची मानसिकता ढळली आहे- मुख्यमंत्री शिंदे

**उद्धव ठाकरेंनी कालच्या बुलडाण्यातील सभेत शिंदे गटातील आमदारांना रेडे, खोके सरकार... असं संबोधल्यानंतर आज एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंवर नाव घेता टीका केली. त्यांची मानसिकता ढळली आहे. नैराश्येतून ते हे बोलत आहेत. सरकारबद्दल लोकांमधून चांगल्या प्रतिक्रिया येत असल्याने त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे, असं शिंदे म्हणाले.**

**आमदारांसह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुवाहटीमध्ये जात कामाख्या देवींचं दर्शन घेतलं. शिवाय आसामच्या मुख्यमंत्र्यांचा पाहुणचार घेतला. यावेळी बोलतांना एकनाथ शिंदे म्हणाले की, कामाख्या देवींचं मनोभावे दर्शन घेतलं. सगळ्यांना समाधान आणि आनंद वाटला. काल आसामच्या मुख्यमंत्र्यांनी आमचं जंगी स्वागत केलं.**

खोक्यांच्या मुद्द्यावरुन उद्धव ठाकरेंना उत्तर देतांना एकनाथ शिंदे म्हणाले की, आमदारांच्या छोट्या-मोठ्या खोक्यांबद्दल काय बोलता? फ्रिजमधून खोके कुठे गेले, कंटेनरमधले खोके कुणाकडे जाऊ शकतात, हे समोर येईल. काल केसरकर यांनी सूचक विधान केलेलं आहेच. आता सगळ्या दुनियेला माहिती होईल, असा थेट इशारा मुख्यमंत्र्यांना उद्धव ठाकरेंना दिला.

# चीनमध्ये करोनाचा हाहाकार

## कठोर निर्बंधाविरोधात नागरिक रस्त्यावर; 'शी जिनपिंग' यांना हटवण्याची मागणी

। नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।


मागील काही दिवसांपासून चीनमध्ये करोनाने पुन्हा हाहाकार माजवला आहे. रविवारी ४० हजार नव्या करोना रुग्णांची नोंद झाली आहे. त्यामुळे सरकारकडून शून्य करोना रुग्ण धोरण राबवण्यात येत आहे. त्यासाठी कडक निर्बंध लागू करण्यात आले आहेत. मात्र, या निर्बंधाविरोधात चीनचे नागरिक रस्त्यावर उतरले असून, राष्ट्रपती शी जिनपींग यांना हटवण्याची मागणी करत आहेत.

शांघाई शहरात रविवारी लोक रस्त्यावर उतरून सरकारविरोधात निदर्शन करत आहेत. 'शी जिनपिग यांना हटवा,' 'कम्युनिस्ट पक्षाला हटवा', 'आम्हाला स्वातंत्र्य पाहिजे', अशा घोषणा नागरिक देत आहेत. या आंदोलनच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शिंजियांगची राजधानी असलेल्यी उरुमकीमध्ये गुरुवारी एका इमारतीला आग लागली होती. त्यामध्ये १० जणांचा मृत्यू झाला होता. करोनाच्या पार्श्वभूमीवर सुरु असलेल्या कठोर निर्बंधामुळे ही इमारत बंद होती. त्यामुळे लोकांना वाचवण्यात अपयश आलं. यानंतर चीनमधील नागरिक संतप्त झाले आहेत. त्यांनी रस्त्यावर उतरून निर्बंध हटवण्याबाबत सरकारविरोधात आंदोलन सुरु केलं



# '२६-११'च्या वेदनेतून भारत-इस्रायल मैत्रिबंध दृढ

## इस्रायली अधिकाऱ्याचे मनोगत



।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

२६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यादरम्यान भारतीय लोक आणि मुंबईकरांचे धैर्य दिसून आले. त्या दिवशी झालेल्या अतोनात हानीतूनच भारत आणि इस्रायल यांच्यात मजबूत मैत्रिबंध निर्माण झाला, असे शनिवारी इस्रायलच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

२६-११ च्या हल्ल्यातून निर्माण झालेली वेदना ही भारत आणि इस्रायल यांच्यातील वेदनेचा समान धागा असून त्याने उभय देश जोडले गेल्याची भावना अनेक इस्रायली नागरिकांनी व्यक्त केली आहे. इस्रायलच्या परराष्ट्र खात्याचे महासंचालक अलॉन उशपिझ यांनी ट्विटरवर म्हटले आहे की, त्या भयानक दिवशी मी भारतीय लोक आणि मुंबईकरांचे धैर्य पाहिले, त्याचे मला आजही स्मरण होते. त्या दिवशी उभय देशांत निर्माण झालेल्या सहकार्याच्या बंधाचा आम्हाला अविरत लाभच होत आहे. दरम्यान, इस्रायलमध्ये शुक्रवारी आणि शनिवारी मुंबई हल्ल्यातील बळींना श्रद्धांजली वाहण्यासाठी अनेक ठिकाणी सभा झाल्या.

## गुजरातमध्ये ऑलिम्पिक आयोजनाचे भाजपचे आश्वासन

# समान नागरी कायद्याची संपूर्ण अंमलबजावणी करू : नड्डा

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

समान नागरी कायद्याची अंमलबजावणी, दहशतवादाचा धोका टाळण्यासाठी कट्टरताविरोधी कक्षाची स्थापना आणि गुजरातमध्ये ऑलिम्पिकचे आयोजन अशी प्रमुख आश्वासने देणारा भाजपचा गुजरात निवडणूक जाहीरनामा शनिवारी प्रसिद्ध करण्यात आला.

गुजरातमधील मदरशांचे सर्वेक्षण आणि वक्फ मंडळाच्या मालमत्तेची छाननी करण्याचे आश्वासनही भाजपच्या जाहीरनाम्यात देण्यात आले आहे. त्याचबरोबर येत्या पाच वर्षांत २० लाख रोजगारसंधी, महिलांसाठी एक लाखाहून



अधिक सरकारी नोकऱ्या आणि राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरवर नेण्याच्या आश्वासनांचाही या जाहीरनाम्यात समावेश आहे. गुजरात विधानसभा निवडणूक डिसेंबरमध्ये होत आहे. त्या अनुषंगाने शनिवारी प्रदेश कार्यालयात पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी जाहीरनाम्याचे प्रकाशन केले.

### जाहीरनाम्यात काय?

- **मदरशांचे सर्वेक्षण, वक्फ मंडळाच्या मालमत्तांचा आढावा घेण्यासाठी टास्क-फोर्स.**
- **देशविरोधी शक्तींचा धोका ओळखण्यासाठी कट्टरताविरोधी कक्षाची स्थापना.**
- **धर्मांतरसक्तीच्या गुन्ह्यासाठी आर्थिक दंडासह सश्रम कारावासाच्या शिक्षेची तरतूद.**
- **नागरिकत्व दुरुस्ती कायद्यानुसार (सीएए) निर्वासितांच्या कल्याणासाठी मुख्यमंत्री शरणार्थी योजना.**
- **मुलींना बालवाडी ते पदव्युत्तर पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत.**
- **एम्सच्या धर्तीवर दोन संस्थांची स्थापना आणि २० हजार सरकारी शाळांचा कायापालट.**
- **१०० अन्नपूर्णा कॅण्टीन सुरू करून पाच रुपयांत तीन वेळचे जेवण.**

## क्रिती सेनॉन होणार प्रभासची बायको?



प्रभास आणि क्रिती सेनॉन सध्या 'आदिपुरुष' या पॅन-इंडियन चित्रपटात एकत्र काम करत आहेत. या चित्रपटापासून हे जोडपं सर्वत्र चर्चेचा विषय बनला आहे. ही दोघं एकमेकांना डेट करत आहेत असंही बोललं जात होतं. 'आदिपुरुष'च्या टीझर लॉन्चच्या वेळी त्यांची केमिस्ट्री आणि त्यांच्यातला बाँड पाहून ते खरोखर एकमेकांना डेट करत आहेत असंच त्यांच्या चाहत्यांना वाटलं. पण आता क्रितीच्या एका वाक्याने सर्वांचं लक्ष त्यांच्या नात्याकडे वेधलं गेलं आहे.क्रिती सेनॉन आणि वरुण धवन यांचा 'भेडिया' हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला. क्रिती सेनॉन गेले काही दिवस त्यांच्या 'भेडिया' या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये खूपच व्यस्त होती. विविध शहरांमध्ये, कार्यक्रमांमध्ये उपास्थिती लावत त्यांनी या चित्रपटाचं जोरदार प्रमोशन केलं. यादरम्यानची त्यांची एक मुलाखत सध्या खूप व्हायरल होत आहे. यात तिने प्रभासशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

क्रितीच्या 'भेडिया' या चित्रपटाच्या प्रमोशन दरम्यान दिलेल्या एका मुलाखतीची एक छोटीशी क्लिप सध्या सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल होत आहे. या मुलाखतीत तिने तिचा 'आदिपुरुष'मधील सहकलाकर प्रभासशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. क्रिती म्हणाली की, "जर मला संधी मिळाली तर मी प्रभासशी लग्न करेन." त्यासोबतच 'आदिपुरुष'च्या शूटिंगच्या वेळी प्रभास क्रितीचा तेलुगूचा शिक्षक बनला होता असंही क्रितीने सांगितलं.

## विकी कौशलच्या 'गोविंदा नाम मेरा' चे पहिले गाणे 'बिजली' झाले प्रदर्शित

विकी कौशल, कियारा अडवाणी आणि भूमी पेडणेकर यांच्या आगामी 'गोविंदा नाम मेरा' या चित्रपटाचा ट्रेलर नुकतेच प्रदर्शित झाले. तसेच निर्मात्यांनी चित्रपटाचे पहिले गाणे 'बिजली' देखील प्रदर्शित केले आहे. हे एक आयटम साँग आहे, ज्यामध्ये कियारा आणि विकीची केमिस्ट्री पाहायला मिळते आहे. गाण्याच्या सुरुवातीला विकी लोकांना 'बिजली' म्हणजेच कियाराबद्दल सांगत आहे. त्यानंतर दोघे एकत्र नृत्य करताना दिसत आहेत. हे गाणे मिका सिंग, नेहा कक्कर आणि सचिन-जिगर यांनी गायले असून सचिन-जिगर यांनी संगीतही दिले आहे.

वायुने या गाण्याचे बोल लिहिले आहेत. चित्रपटात विकी एका स्ट्रगलिंग कोरिओग्राफर गोविंदाच्या भूमिकेत आहे. याचे दिग्दर्शन शशांक खेतान यांनी केले असून कथाही त्यांनीच लिहिली आहे. चित्रपट करण जोहरच्या प्रोडक्शन हाऊस



धर्मा प्रोडक्शनच्या बॅनरखाली तयार करण्यात आला आहे.

## नातेसंबंधांचे अनेक पैलू: 'लस्ट स्टोरीज2'

चित्रपट निर्माता सुजॉय घोष सध्या त्याच्या अँथॉलॉजी वेब सीरिज 'लस्ट स्टोरीज २' वर काम करत आहे. या चित्रपटात काजोल मुख्य भूमिकेत दिसणार आहे. पुढच्या वर्षी १४ फेब्रुवारीला हा चित्रपट प्रदर्शित होऊ शकतो, अशी चर्चा आहे. शोचे निर्मिते २०२३ च्या व्हॅलेंटाईन डे ला रिलीज करण्याची योजना आखत आहेत. हा शो मानवी नातेसंबंधांचे अनेक पैलू दाखवतो. त्यामुळे शो प्रदर्शित करण्यासाठी हीच वेळ सर्वोत्तम असल्याचे त्यांना वाटते. यात काजोलशिवाय अंगद बेदी, तमन्ना भाटिया आणि तिलोत्तमा सोम यांच्याही भूमिका आहेत. हा शो सध्या पोस्ट प्रोडक्शनच्या टप्प्यात आहे. आर बाल्की, कोंकणा सेन शर्मा आणि अमित रवींद्रनाथ शर्मा सुजॉयसोबत या वेब सिरीजचे दिग्दर्शनही करत आहेत. मृणाल ठाकूर आणि अंगद व्यतिरिक्त, आर बाल्कीच्या कथेत नीना गुप्ता देखील आहेत. 'लस्ट स्टोरीज' २०१८ मध्ये नेटफ्लिक्सवर आली होती. २०१३ मध्ये प्रदर्शित झालेल्या



## नंदमुरी बालकृष्णासह तेलुगु चित्रपटात दिसेल सोनाक्षी सिन्हा

सोनाक्षी सिन्हाने नुकताच तिचा पहिला तेलुगु चित्रपट साईन केला आहे. माहितीनुसार, सोनाक्षी दक्षिणेतील अभिनेता नंदमुरी बालकृष्ण यांची भूमिका असलेल्या चित्रपटात दिसणार आहे. नुकतीच ती यासाठी हैदराबादलाही आली होती. अनिल रविपुडी याचे दिग्दर्शन करणार असून डिसेंबरमध्ये या चित्रपटाची घोषणा होणार आहे. सोनाक्षी तिच्या करिअरची या नव्या इनिंगसाठी पूर्णपणे तयार व उत्सुक आहे. नंदमुरी बालकृष्ण हे अभिनेता तसेच निर्माता आणि राजकारणी आहेत. सोनाक्षीने २०१४ मध्ये तमिळ ॲक्शन ड्रामा फिल्म 'लिंगा'मधून दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत पदार्पण केले होते. या चित्रपटात सोनाक्षीने रजनीकांतसोबत काम केले. त्याच नावाने तो हिंदी आणि तेलगू भाषांमध्येही प्रदर्शित झाला. 'लिंगा'मध्ये सोनाक्षीने भारती नावाची भूमिका साकारली होती. तसेच सोनाक्षी लवकरच 'ककुडा' या विनोदी भयपटात चित्रपटात दिसेल. या चित्रपटात रितेश देशमुख आणि साकिब सलीम देखील दिसणार आहेत.



## अरिजित सिंग लाइव्ह कॉन्सर्टच्या एका तिकिटाची किंमत तब्बल 16 लाख!



अरिजित सिंग हा आपल्या देशातील आघाडीचा गायक आहे. गेली अनेक वर्ष तो त्याच्या आवाजाने प्रेक्षकांना भुरळ घालत आला आहे. त्याने आतापर्यंत असंख्य एक से बढकर एक सुपरहिट गाणी दिली आहेत. अरिजित सिंगचे करोडो चाहते आहेत. त्या चाहत्यांना अरिजितचे गाणे प्रत्यक्ष ऐकता यावे यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी त्याच्या लाईव्ह कॉन्सर्टसचेही आयोजन केले जाते. पण आता त्याच्या कॉन्सर्टच्या तिकिट दराचा एक फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. तो फोटो पाहून चहा ते त्याच्या कॉन्सर्टकडे पाठ फिरवणार असं दिसतंय.

पुढील वर्षी जानेवारी महिन्यात अरिजित सिंगच्या कॉन्सर्टचे आयोजन करण्यात आले आहे. या कॉन्सर्टच्या बुकिंगचा एक स्क्रीनशॉट सध्या व्हायरल होत आहे. या फोटोमध्ये कॉन्सर्टच्या तिकिटांची किंमत दिसते आहे. या व्हायरल फोटोनुसार अरिजितच्या कॉन्सर्टच्या एका तिकिटाची किंमत तब्बल १६ लाख रुपये आहे.

या फोटोमध्ये विविध प्रकारच्या तिकिटांचे दर दिसत आहेत. या कॉन्सर्टच्या तिकिटांची सुरुवात ९९९ रुपयांपासून होत आहे. तर याचे सर्वात महागडे तिकिट १६ लाख रुपयांचे आहे. हे १६ लाख रुपयांचे तिकिट प्रीमियम लाउंज या कॅटेगरीतील आहे. म्हणूनच त्याचे दर एवढे जास्त असल्याचे बोलले जात आहे. याशिवाय १२ आणि १४ लाखाचेही तिकिट आहे. हा फोटो व्हायरल होताच सोशल मीडियावर या फोटोवर भन्नाट कमेंट्स येत आहेत.

अरिजितने आतापर्यंत गायलेली जास्तीत जास्त गाणी ही सॅड साँग आहेत. त्यामुळे "रडण्यासाठी १६ लाख कुणी खर्च करू नये," अशी कमेंट एका नेटकऱ्याने केली. दुसरा नेटकरी म्हणाला, "१६ लाख रुपये खर्च करून तिथे रडण्यापेक्षा मी एकटा घरी रडेन." तर आणखी एका नेटकऱ्याने लिहिलं, "१६ लाखात अरिजीतच्या शेजारी घर घेऊ म्हणजे रोज त्याचे गाणे ऐकता येईल." हा फोटो सध्या चांगलाच व्हायरल होत असून तो सोशल मीडियावर चर्चेचा विषय बनला आहे.

# लिओनेल मेस्सीसाठी वेडे झाले संपूर्ण जग

## 28 वर्षांनंतर स्टेडियममध्ये पोहोचले सर्वाधिक प्रेक्षक

**पुणे । महाईन्यूज**



फिफा विश्वचषक २०२२ मध्ये अर्जेंटिनाचा संघ विजयी मार्गावर परतला आहे.अर्जेंटिनाने मेक्सिकोला २-० ने पराभूत करून उपउपांत्यपूर्व फेरी गाठण्याच्या आशा जिवंत ठेवल्या. या दरम्यान लिओनेल मेस्सीचा खेळ पाहण्यासाठी ८८,९६६ प्रेक्षक स्टेडियममध्ये उपस्थित होते. २८ वर्षांतील फुटबॉल विश्वचषकाच्या सामन्यात प्रेक्षकांची ही सर्वात मोठी संख्या आहे. फिफाच्या मते, दोहाच्या उत्तरेकडील लुसेल स्टेडियम, यूएस मध्ये १९९४ च्या फायनलनंतर विश्वचषक प्रेक्षकांची संख्या सर्वाधिक आहे. कॅलिफोर्नियाच्या पासाडेना येथील रोझ बाउल येथे नियमित वेळेत गोलविना बरोबरी झाल्यानंतर, पेनल्टी शूटआऊटमध्ये ब्राझीलने इटलीचा पराभव करून विजेतेपद पटकावले होते. हे पाहण्यासाठी त्यावेळी ९१,१९४ लोक उपस्थित होते. शनिवारची उपस्थिती लुसेल स्टेडियमवरील मागील दोन सामन्यांपेक्षा शंभराहून अधिक होती. जेव्हा ब्राझीलने सर्बियाचा पराभव केला आणि अर्जेंटिना सौदी अरेबियाविरुद्ध हरले. कतारमधील उपस्थितीचे आकडे सर्वकालीन विश्वचषक सामन्यांसाठी शीर्ष ३० मध्ये देखील स्थान मिळवू शकत नाहीत. १९५० मध्ये रिओ दि जानेरो येथे उरुग्वेने ब्राझीलवर २-१ असा विजय मिळवला, तेव्हा माराकाना स्टेडियममध्ये १,७३,८५० लोक पस्थित होते, जे आतापर्यंतच्या विश्वचषकातील सर्वाधिक संख्या होती. ४व्या मिनिटाला एंजल डी मारियाच्या पासवर लिओनेल मेस्सीने २५ यार्डच्या अंतरावरून गोल केला. संघासाठी दुसरा गोल बदली खेळाडू एन्झो फर्नांडिसने ८७व्या मिनिटाला केला.

# भारत-न्यूझीलंड सामना संततधार पावसामुळे अखेर रद्द!

## टीम इंडियाच्या मालिका विजयाच्या स्वप्नावर पाणी

**दोहा। महाईन्यूज । वृत्तसंस्था**



भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील दुसरा एकदिवसीय सामना रविवारी हॅमिल्टन येथील सेडॉन पार्क स्टेडियमवर खेळवला जाणार होता. टीम इंडियासाठी हा सामना करो या मरो अशा प्रकारचा असणार होता. हा सामना गमावल्याने भारतीय संघ मालिकाही गमावेल अशी परिस्थिती होती. शेवटी न्यूझीलंडमध्ये शिखर धवनच्या नेतृत्वाखाली युवा टीम इंडियाचे मालिका विजयाचे स्वप्न भंगले. मालिका वाचविण्यासाठी भारताला तिसरा आणि अंतिम सामना जिंकणे गरजेचा आहे, जेणेकरून मालिकेत बरोबरी साधता येईल.

सकाळी न्यूझीलंडचा कर्णधार केन विलियम्सनने सलग दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात नाणेफेक जिंकत प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. दोन्ही संघांनी आजच्या सामन्यात बदल केला होता. न्यूझीलंड संघात दुखापतग्रस्त ॲडम मिल्नेच्या जागी मायकेल ब्रेसवेलला स्थान देण्यात आले होते. तसेच भारतीय संघातही दोन बदल करण्यात आले होते. संजू सॅमसनच्या जागी अष्टपैलू दीपक हुडाचा तर शार्दुल ठाकूरच्या जागी दीपक चहरला संधी देण्यात आली होती. शार्दूल ठाकूरला पाठीचा त्रास अधिक जाणवत असल्याने सुरक्षेचा उपाय म्हणून संघ व्यवस्थापनाने हा निर्णय घेण्यात आला आहे. तत्पूर्वी, सामना सुरु होण्याआधी हॅमिल्टन येथील सेडॉन पार्कवर खूप पाऊस पडला असल्याने मैदान ओलसर झाले होते. त्यामुळे नाणेफेकीला देखील विलंब झाला. १५ मिनिटे उशिराने सामन्याला सुरुवात झाली होती. भारतीय प्रमाणवेळेनुसार ६.४५ मिनिटांनी नाणेफेक न होता ती ७.०० वाजता झाली होती. पुन्हा सुरु झालेल्या पावसामुळे सामना थांबविण्यात आला तेव्हा पहिल्या पाच षटकात भारतीय सलामीवीरांनी चांगली सुरुवात केली होती. पण त्यानंतर पुन्हा पावसाला सुरुवात झाली.त्यानंतर तब्बल तीन तास पावसाने खोडा घातल्यामुळे सामना थांबविण्यात आला होता. अखेर भारतीय प्रमाणवेळेनुसार ११.१० मिनिटांनी सामन्याला पुन्हा सुरुवात झाली आणि पावसामुळे सामन्यातील नियमात बरेच बदल करण्यात आले होते.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही